चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
१४ एप्रिल, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपुर पोलीसांची दारूतस्कीवर कार्यवाही

दिनांक १३/०४/२०१९ रोजी पोलीस स्टेशन सावली येथील पोलीस पथकाने मिळालेल्या गोपनीय माहिती वरून गडचिरोली ते मुल रोडवर नाकेबंदी लावुन एका संशयीत चारचाकी वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये एक विशेष कप्पा दिसुन आला. सदर वाहनाची तपासणी केली असता वाहनातील छुप्या कप्प्यात ४००० नग देशी दारूच्या निपा मिळुन आल्याने सदरचा माल आणि अशोक लेलॅंड पिक अप वाहन असा एकुण ८,००,०००/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन सावली येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास सुरू आहे.

तसेच जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन **रामनगर, वरोरा, बल्लारशाह, शेंगाव, ब्रम्हपुरी, चिमुर, पाथरी, पोंभुर्णा, सावली, धाबा, विरूर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **२०** गुन्हयाची नोंद केली. त्यामध्ये ०७ आरोपीतांना अटक करण्यात आले असुन एकुण **१,९१,८००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याप्रमाणे जिल्हयात एकुण **९,९१,८००**/—रू चा अवैध दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

———————————————————————————————————————